# आजिवन शिक्षण व विस्तार विभाग
# कालिकादेवी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, शिरूर
# वार्षिक अहवाल 2022 - 23

आजिवन शिक्षण व विस्तार विभाग

**प्रमाणपत्र अभ्यासक्रम अंमलबजावणी बाबत व्याख्यान**

(महाविद्यालय स्तरावरील कार्यक्रम) दिनांक 08/08/2022-

विद्यार्थी समुपदेशन व व्यवसाय मार्गदर्शन शिबीर




विद्यार्थी समुपदेशन व मार्गदर्शन कार्यशाळेला मार्गदर्शन करतांना डॉ. आनंद वाघ, व्यासपीठावर प्राचार्य। डॉ. विश्वास कंधारे, डॉ. संजय खंडारे, डॉ. राजेश खरात, प्रा. डॉ. वी. टी. पवार.

कालिकादेवी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात दिनांक 08/08/2022 रोजी आजिवन शिक्षण व विस्तार विभागा अंतर्गत चालणाऱ्या स्वयंनियांही अभ्यासक्रम मा. डॉ. आनंद वाघ यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद, अंतर्गत

चालणाऱ्या कोर्सची अंमलबजावणी या विषयी सविस्तर मार्गदर्शन केले. शिक्षणामुळे माणसाला जीवन कळते. शिक्षणामुळे माणसात संस्कार निमती होते. शिक्षणामुळे माणसाला सामाजिक भान प्राप्त होते. शिक्षणामुळे माणूस जानी बनतो. ज्ञानी माणसाला समाजात मान मिळतो. पण अज्ञानी माणसाला समामध्ये सतत अपमान सहन करावा लागतो.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विश्वास कंधारे हे होते. पुढे बोलतांना प्राचार्य साहेब म्हणाले की, या कोर्समुळे रोजगार निर्माण होतील व बेकारी कमी होईल. या प्रसंगी महाविद्यालयातील भौतिकशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. संजय तुपे ज्यांना पारीतोषिक मिळाल्या बद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. अशोक पोळले यांनी केले तर आभार प्रा. विठ्ठल मुंडे यांनी मानले.

------------------------------------

## आरोग्याचा ध्यास ठेवा सौंदर्य आपोआप उजळेल- डॉ. चेतना डोंगळीकर

दि.09 सप्टेंबर 2022 रोजी आर्वी येथील अनाथ बाल आश्रम व शाळेला भेट देवून तेथील विद्यार्थ्यांना समुपदेशन केले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षा कावेरी नागरगोजे होत्या तर प्रमुख पाहुण्या म्हणून डॉ. चेतना डोंगळीमर होत्या, चेतना डोंगळीकर म्हणाल्या की, बालवयात मुली व मुलांनी व मुलांनी आपल्या आरोग्याची काळजी घेतली पाहीजे. आरोग्याचा ध्यास ठेवा सौदर्य आपोआप उजळेल, असेही त्या म्हणाल्या.



या प्रसंगी प्रा. डॉ. पवार बी. टी. यांनी आजीवन शिक्षण व विस्तार सेवा विभागाअंतर्गत चालणाऱ्या वेगवेगळया कोर्सेस बद्दल माहिती सांगितली. स्वावलंबी बनण्याचे साधन व्यवसाय आहे. असे विचार त्यांनी व्यक्त केले. डॉ. अशोक घोळवे यांनी विद्यार्थ्यांना राष्ट्रीय सेवा योजना विभागा मार्फत चालणाऱ्या कार्याविषयी माहिती दिली. पुढे बोलताना ते म्हणाले की, विद्याथ्र्यांनी आपले शरीर देशसेवेसाठी झिजवले.

देशभक्ती या राष्ट्राला तारू शकते. राष्ट्रभक्ती जागृत होणे ही काळाची गरज आहे. तरूणांच्या जागृतीमुळे देश स्वावलंबी बनू शकतो. असे विचार त्यांनी व्यक्त केले. राष्ट्रीय सेवा योजना विभागा मार्फत चालवणाऱ्या विविध कार्यक्रम व उपक्रमांचा उहापोह त्यांनी या प्रसंगी केला.

---

## विद्यार्थी समुपदेशन व व्यवसाय मार्गदर्शन शिबीर

दि. 08 फेब्रुवारी 2023 ते दि. 09 फेब्रुवारी 2023

सत्र पहिले

महाविद्यालयातील कै. सौ. केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर सभाग्रहामध्ये दि. 08 फेब्रुवारी 2023 ते दि. 09 फेब्रुवारी 2023 या दिवशी विद्यार्थी समुपदेशन व व्यवसाय मार्गदर्शन शिबीर आयोजित करण्यात आले. या शिबीराचे नियोजन आजीवन शिक्षण व विस्तार सेवा विभागाने केले हे शिबीर महा संघात घेण्यात आले. या प्रसंगी उद्घाटन सत्र घेण्यात आले. या प्रसंगी उद्घाटक म्हणून डॉ. आनंद याच (सहाय्यक संचालक आजीवन शिक्षण व विस्तार सेवा विभाग डॉ. बा. आ. म. विद्यापीठ, औरंगाबाद) हे होते. या कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विश्वास कंधारे होते. या उद्घाटन सत्राचे प्रमुख उद्घाटक डॉ. आनंद वाघ आपल्या मनोगतात म्हणाले की, शिक्षणामुळे माणसाला जीवन कळते. शिक्षणामुळे माणसात संस्कार निर्मीती होते. शिक्षणामुळे माणसाला सामाजिक भान प्राप्त होते. शिक्षणामुळे माणूस ज आनी बनतो. ज्ञानी माणसाला समाजात मान मिळतो. पण अज्ञानी माणसाला समामध्ये सतत अपमान सहन करावा लागतो.




**सत्र दुसरे**

या कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते डॉ. संजय खंडारे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना म्हणाले की, शालेय जीवनामध्ये ठरवलं पाहिजे की मला काय करायचे आहे. आणि हे ठरवूनच आपले ध्येय निश्चित केले पाहिजे. वेळ कोणासाठीही थांबत नसतो. म्हणून आजच वेळापत्रक ठरवा आणि अभ्यासाला लागा. अभ्यासाचे नियोजन करून अभ्यास केला पाहिजे. नोटस् आपण स्वत: काढल्या पाहिजेत. तरूण पिढी वाचण्यापेक्षा नाचण्यात जास्त वेळ घालवते. आपले आई वडील उन्हा तान्हात काबाड कष्ट करतात आणि आपल्याला पैसा पुरवतात. महाविद्यालयात आपण तीन वर्ष एन्जॉय करण्यापेक्षा अभ्यास केला पाहीजे. महाविद्यालयातील तासिका व अभ्यास तुम्हास यशाच्या मार्गाकडे घेवून जाईल. स्वप्न माणसाने नेहमी बघावे पण स्वप्नाला प्रेरणेची जोड द्यावी. तरच स्वप्न पूर्ण होतात. विद्यार्थ्यांनी परिस्थितीचे कारण पुढे आणू नये. शासनाच्या विविध योजना आहेत. त्याचा लाभ घेवून शिक्षण घेतले पाहिजे, असेही ते शेवटी म्हणाले.

सत्र तिसरे

## पर्यटनामुळे 8 टक्के रोजगाराच्या संधी- डॉ. विठ्ठल गुंडे

प्रमुख वक्ते डॉ. विठ्ठल बाबुराव गुंडे बोलतांना म्हणाले की, पर्यटनामुळे १ टक्के रोजगाराच्या संधी उपलब्ध झाल्या आहेत, गेल्या वर्षी भारतात 55 लाखांपेक्षा जास्त पर्यटक भारतात आले होते 74 कोटी भारतीय पर्यटकांनी विविध पर्यटकांनी विविध पर्यटन स्थळांना भेटी दिलेल्या आहेत. यात मेरो की, पर्यटनाची मागणी दिवसेन दिवस वाढत आहे. या माध्यमातून व्यवसायाची संधी होत 1. हॉटेल - पर्यटकांसाठी चहा, उत्तम जेवणाची सोय, उत्तम दर्जाचे निवासस्थान स्वच्छतागृ 2. दुभाषी मार्गदर्शक पर्यटकांसाठी दुभाषी मार्गदर्शक आवश्यक असतो. या माध्यमातून रोजगाराची निर्माती होते. 3. सहलीचे आयोजन आज मोठ्या प्रमाणात सहलीचे आयोजन करून व्यवसाय वाढविण्यास प्रारंभ झालेला आहे. या माध्यमातून देश विदेशात सहलीचे आयोजन केले जात असून यातून व्यवसायाच्या संधी उपलब्ध होत आहेत. 4. होम स्टे:- यामध्ये तुमच्या स्वतःच्या मालको घर भर असेल तर शासनाच्या संरक्षीत क्षेत्रात असेल तर पर्यटनदीच्या ठिकाणी असेल तर ववभागात नोंद करून आर्थिक मावेजा मिळतो. होम स्टे ही संकल्पना मोठ्या प्रमाणात आहे. असे म्हणाले.

-----------------------------

सत्र चौथे

## आर्थिक साक्षरता काळाची गरज- डॉ. पंडित मुळे

एक काळ असा होता की लोकांना शिक्षणाचे महत्व कळले नाही. याचा फायदा काही सुशिक्षीतांनी घेतला. अनेक निरक्षर लोकांची फसवणूक केली. याचे गांभीर्य लक्षात घेवून तत्कालीन पंतप्रधान राजीव गांधी यांनी 5 में 1988 या दिवशी राष्ट्रीय साक्षरता मिशन कार्यक्रमाला सुरुवात केली. आपल्या जवळील धनाचे योग्य नियोजन म्हणजे आर्थिक नियोजन होय. आर्थिक साक्षरता ही काळाची गरज आहे. आरोग्य विमा: आरोग्य विमा व्यक्तीसाठी महत्वाचा आहे. 2. शासकीय बॉन्ड - काही रकमेचे आपण बॉन्ड खरेदी केल्यानंतर त्यात वाढ झाली तर ते विकता येते. 3. शेअर मार्केट : पेसा वाढविण्यासाठी शेअर मार्केट हे साधन आहे. 4. पोस्ट योजना - पोस्ट योजनेच्या माध्यमातून सर्वसामान्यांना याचा फायदा होतो 5. प्रॉपर्टी विमा:- आपल्या प्रॉपर्टींचा विमा करून घेतला पाहिजे. 6. टर्म इन्शुरंन्स आपले काही बरे वाईट झाल्यास आपण टर्म इन्शुरंश काढलेला असल्यास आपल्या कुटुंबाला त्याचा फायदा होतो.

## भारतीयांच्या विकासात कृषी क्षेत्राचे योगदान - अर्जुन चव्हाण

प्रमुख वक्ते अर्जुन चव्हाण म्हणाले की, भारतीय जनतेच्या उदर निर्वाहासाठी सर्वात मोठे क्षेत्र म्हणजे कृषी क्षेत्र होय. देशाच्या अर्थव्यवस्थेला भांडवल निर्मीतीत कृषी क्षेत्राचा वाटा 1950-51 मध्ये 17.7 टक्के होता. तो 2016-17 मध्ये 15.5 टक्के झाला आहे. कृषी क्षेत्र भारतातील सर्वात मोठे मुक्त खाजगी क्षेत्र आहे. भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सव सुरू आहे. गेल्या 75 वर्षात स्वतंत्र भारताने अनेक क्षेत्रामध्ये उत्तुंग भरारी घेतली आहे. अनेक आव्हाने आजही आहेत. अन्नधान्याची तूट भरून काढत उपासमारीला काढत उपासमारीच्या संकटातून भारताला बाहेर काढले. सर्वच प्रमुख कृषी उत्पादनात वाढ करून देशाने उल्लेखनीय कामगिरी केली आहे. देशाची निम्मी लोकसंख्या आजही शेतीशी संबंधीत क्षेत्रात असल्याने कृषी क्षेत्र हे राष्ट्रीय अर्थव्यवस्थेला अतिशय महत्वपूर्ण घटक आहे. जगातील एकूण शेतीखालील क्षेत्रापैकी 11 टक्के वाटा भारताचा आहे. अन्नधान्य, कापूस, ऊस, बागायती पिके, दुग्धव्यवसाय, कुक्कुटपालन, मस्त्यपालन, आदीसह भारत दुसऱ्या नंबरवर आहे. भारत कृषी क्षेत्रात अग्रेसर होईल, असे ते म्हणाले.

समारोप सत्र

दोन दिवशीय विद्यार्थी समुपदेशन कार्यशाळेचे समारोप सत्राचे प्रमुख वक्ते म्हणून प्राचार्य आप्पासाहेब येवले हे होते. या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. विश्वास कंधारे होते. कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते आप्पासाहेब येवले म्हणाले की, विद्यार्थी समुपदेश कार्यशाळेतून जे ज्ञान विद्यार्थ्यांना मिळत आहे, त्यामुळे व्यवसाय मार्गदर्शन तर मिळतच आहे. विद्यार्थ्यांना आपल्या जीवनात यशस्वी होण्यासाठी अनुभवी व्यक्तींचे मार्गदर्शन फार महत्वाचे असते. अशा कार्यशाळेतून विद्याथ्र्यांतून चांगले उद्योगपती घडू शकतात. त्यामुळे या दोन दिवशीय कार्यशाळेत जे वेगवेगळया क्षेत्रातील प्रमुख मार्गदर्शक आले, त्यांनी त्यांचे अनुभव कथन केले त्यातून विद्यार्थी प्रेरणा घेवून आपले जीवन यशस्वी करतील. या कार्यशाळेचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. विश्वास कंधारे सरांनी विद्यार्थी समुपदेशन कार्यशाळेतून जे जेष्ठ मार्गदर्शक आले त्यांनी जे मोलाचे मार्गदर्शन केले त्याचा लाभ विद्यार्थ्यांनी घेतला पाहीजे. स्वतः चे व्यक्तीमत्व विकास करून आपले अष्टपैलू व्यक्तीमत्व घडवावे. त्यातून देशाचे व राज्याचे नाव लौकीक होईल. विद्यार्थी स्वयंपूर्ण होतील, असे ते म्हणाले.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. पवार बी. टी. यांनी केले व आभार प्रदर्शन प्रा. विठ्ठल जाधव यांनी केले. या कार्यक्रमास प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी व विद्यार्थीनी बहुसंख्येने उपस्थित होते.

प्रा. डॉ. पवार बंडू थावराप्राचार्य
(समन्वयक) आजिवन शिक्षण व विस्तार विभाग

दैनिक **लोकाशा** महाराष्ट्राच्या मनाचा नकाशा

11FEB2023

# ज्ञानी माणसाला मान व अज्ञानी माणसाला अपमान मिळतो–डॉ.वाघ

शिरूर कासार, दि. १० ( लोकाशा न्युज):-शिक्षणामुळे माणसाला जीवन कळते व संस्कार निर्मिती होते. शिक्षणामुळे माणूस ज्ञानी बनतो. ज्ञानी माणसाला समाजामध्ये मान मिळतो. पण अज्ञानी माणसाला समाजामध्ये सतत अपमान सहन करावा लागतो. असे प्रतिपादन डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद येथील अजीवन शिक्षण व विस्तार विभागाचे संचालक डॉ.आनंद वाघ यांनी केले. ते विद्यार्थी समुपदेशन व व्यवसाय मार्गदर्शन विद्यार्थी समुपदेशन व व्यवसाय मार्गदर्शन प्रसंगी बोलत होते.



कालिकादेवी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील अजीवन शिक्षण व विस्तार विभाग व स्पर्धा परीक्षा यांच्या संयुक्त विद्यमाने दोन दिवशीय विद्यार्थी समुपदेशन व व्यवसाय मार्गदर्शन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विश्वास कंधारे तर प्रमुख पाहुणे डॉ. संजय खंदारे, डॉ.राजेश खरात हे उपस्थित होते. व्यासपीठावर अजीवन शिक्षण विस्तार सेवा विभागाचे समन्वयक डॉ. बी.टी पवार, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राचे संचालक डॉ. विठ्ठल जाधव यांची प्रमुख उपस्थिती होती. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक स्पर्धा परीक्षा केंद्राचे समावेश डॉ. विठ्ठल जाधव यांनी तर सूत्रसंचालन अजीवन शिक्षण व विस्तार सेवा विभागाचे समन्वयक डॉ.बी.टी पवार यांनी केले. उपस्थित मान्यवरांचे आभार डॉ.नवनाथ पवळे यांनी मानले. या कार्यक्रमाला महाविद्यालयातील प्राध्यापक, कर्मचारी, विद्यार्थी, विद्यार्थिनी बहुसंख्येने उपस्थित होते.

कार्यारंभ

Saturday 2023/02/11

# ज्ञानी माणसाला समाजात मान मिळतो

## डॉ.आनंद वाघ : कालिका देवी महाविद्यालयामध्ये विद्यार्थी समुपदेशन, व्यवसाय मार्गदर्शन कार्यशाळा

प्रतिनिधी। शिरूर कासार

दि.१० : शिक्षणामुळे माणसाला जीवन कळते. शिक्षणामुळे माणसात संस्कार निर्मिती होते. शिक्षणामुळे माणसाला सामाजिक भान प्राप्त होते. शिक्षणामुळे माणूस ज्ञानी बनतो. ज्ञानी माणसाला समाजामध्ये मान मिळतो. पण अज्ञानी माणसाला समाजामध्ये सतत अपमान सहन करावा लागतो, असे प्रतिपादन डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद येथील अजीवन शिक्षण व विस्तार विभागाचे संचालक डॉ. आनंद वाघ यांनी केले.

येथील कालिकादेवी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील अजीवन शिक्षण, विस्तार विभागाच्या संयुक्त विद्यमाने दोन दिवशीय विद्यार्थी समुपदेशन व व्यवसाय मार्गदर्शन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी उद्घाटन करताना केले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.विश्वास कंधारे हे होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. संजय खंदारे, डॉ.राजेश खरात हे उपस्थित होते. व्यासपीठावर अजीवन शिक्षण विस्तार सेवा विभागाचे समन्वयक डॉ.बी.टी.पवार, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राचे संचालक डॉ. विठ्ठल जाधव यांची प्रमुख उपस्थिती होती.



पुढे बोलताना डॉ.आनंद वाघ म्हणाले की, तरुण या राष्ट्राचे आधारस्तंभ आहेत या देशाचे भवितव्य तरुणावर अवलंबून आहे. तुम्ही या देशाचे आधारस्तंभ आहात आणि म्हणून तुम्ही बदललं पाहिजे तुम्ही स्वतःला पुढे नेलं पाहिजे आणि स्वतःला पुढे जर न्यायचं असेल तर तुमच्यातील जी शक्ती आहे. एक आदर्श शक्ती आहे. त्या शक्तीचा विचार करा आणि त्याची ताकद तुम्ही पणाला लावा ज्याला जे क्षेत्र आवडते. त्या क्षेत्रामध्ये त्यांनी जावे, पण ज्या क्षेत्रामध्ये गेले आहे. त्यामध्ये एक नंबर व्हावे. तुम्ही स्वतःला कधीही कमी लेखू नका. तुम्ही तुमचे व्यक्तिमत्व घडवा. त्या व्यक्तिमत्वाला बाहेर आणण्याचा प्रयत्न करा. तुमच्यामध्ये गायक आहे. तुमच्यामध्ये कवी आहे. तुमच्यामध्ये साहित्यिक आहे. तुमच्यात विचारवंत आहे. त्याला तुम्ही बाहेर आणण्याचा प्रयत्न करा आणि त्याला बाहेर आणून त्याला खतपाणी घाला. आपल्या व्यक्तिमत्वाला जागृत करा आपणच आपल्या व्यक्तिमत्त्वाला आकार देत असतो. आपल्या व्यक्तिमत्तेमध्ये आपण रंग भरा, आपले जीवन सफल करून घ्या, असा संदेशही शेवटी त्यांनी या उद्घाटन प्रसंगी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना दिला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक स्पर्धा परीक्षा केंद्राचे समावेश डॉ.विठ्ठल जाधव यांनी केले. सूत्रसंचालन अजीवन शिक्षण व विस्तार सेवा विभागाचे समन्वयक डॉ.बी.टी.पवार यांनी केले. उपस्थित मान्यवरांचे आभार डॉ. नवनाथ पवळे यांनी मानले. या कार्यक्रमाला महाविद्यालयातील शिक्षक शिक्षक कर्मचारी विद्यार्थी विद्यार्थिनी बहुसंख्येने उपस्थित होते.